सं.फौ.ख.क्र.३२३/२०२५
शासन विरुध्द सलमान.
नि.क्र.८ खाली.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – अमित भरत सुर्वे.
वय – ४१ वर्षे, कामधंदा – पोलिस उप–निरीक्षक.
नेमणूक – पोलिस ठाणे वाई, ता. वाई, जि. सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता सौ. ए. आर. सुळ** –

दिनांक ११.०३.२०२५ रोजी मी पोलिस ठाणे वाई येथे पोलिस उप–निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. त्याठिकाणी मी मागील एक वर्षापासून कार्यरत आहे. त्या दिवशी मला ठाणे अंमलदार यांनी प्रस्तुत प्रकरणात तपासकाम करण्याचे आदेशित केले होते. आता मला त्याबाबतचा लेखी आदेश दाखविण्यात आला. त्यावर ठाणे अंमलदार श्रीमती प्रियंका कदम यांची सही असून त्याद्वारे मला प्रस्तुत प्रकरणात तपासकाम सोपविण्यात आले आहे. मी श्रीमती कदम यांची सही ओळखतो कारण त्या माझ्या सहकर्मचारी आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते.

२. तपासकाम करतेवेळी मी फिर्याद, पंचनामा, मुद्देमाल पावती इत्यादी दस्त पडताळून पाहिले होते. पुढील तपासादरम्यान मी साक्षीदारांची तपास टिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली होती. तसेच, मी आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५(३) अन्वये अटकेची सुचना दिली होती. तपासाअंती मला असे निष्पन्न झाले की, आरोपीने मोबाईलवरील फनॲपद्वारे लोकांकडून पैसे स्वीकारून जुगार खेळ केला होता. त्यामुळे, मी त्याच्या विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एम. वाय. शिंदे** –

३. हे म्हणणे खरे आहे की, जुगार खेळताना किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे आहे की, मला तपासादरम्यान आरोपीने कथितरित्या नेमक्या कोणत्या व्यक्तींकडून जुगाराकरीता पैसे स्वीकारले होते त्याबाबत निष्पन्न झाले नव्हते. हे

म्हणणे खरे आहे की, फन या मोबाईल ॲपबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात कोणतीही जप्ती पंचनामा कारवाई मी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे तपासकाम सुपुर्द होण्यापुर्वीच कथित जप्ती पंचनामा कारवाई झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीकडे कथितरित्या मिळून आलेल्या मोबाईलमध्ये नेमक्या कोणत्या ॲप्स चालू होत्या व त्यापैकी कोणत्या ॲपद्वारे आरोपी कथितरित्या जुगार खेळ करीत होता याबाबत तपासकाम केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कथित मोबाईल कथितरित्या पुर्वीच जप्त झाल्याने त्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणात चुकीचा तपास केला व चुकीच्या निष्कर्षाप्रत पोहचून खोटे दोषारोपपत्र सादर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास काहीही नाही**.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.१३.०२.२०२६.

(आर. एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, वाई.